अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत
केलेल्या पद भरतीच्या मर्यादेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अकंपा -१२१९/प्र.क्र. ५६/आठ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९.

**वाचा :** शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा -१२१९/प्र.क्र. ५६/आठ, दि.१०.०६.२०१९

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन शासन निर्णयानुसार सरळसेवेने भरावयाच्या ज्या पदांच्या भरतीस वित्त विभागाचे निर्बंध नाहीत अशी पदे सरळसेवेने भरताना, प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत आणि सरळसेवेने भरावयाच्या ज्या पदांच्या भरतीवर वित्त विभागाचे निर्बंध असतील अशी पदे सरळसेवेने भरताना प्रतिवर्षी रिक्त असलेल्या पदांपैकी पद भरण्यास मान्यता असलेल्या पदांच्या २०% पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत असे आदेश आहेत.

तथापि, अनुकंपा नियुक्तीचे अल्प प्रमाण, दिर्घकाळ प्रलंबित प्रतिक्षासूची, प्रतिक्षासूचीची वाढत जाणारी संख्या तसेच अनुकंपा नियुक्ती धारक आणि लोकप्रतिनिधी इ.कडून अनुकंपा नियुक्ती तात्काळ मिळण्यासंदर्भात वारंवार होणारी मागणी या बाबी विचारात घेवून, अनुकंपा नियुक्तीद्वारे पदभरतीस असलेल्या मर्यादेमध्ये काही कालावधीसाठी शिथिलता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

संदर्भाधीन शासन निर्णयातील अनुकंपा नियुक्तीच्या भरतीसाठी असलेली १०% व २०% ची मर्यादा शिथील करुन, वित्त विभागाचे ज्या पदांच्या भरतीवर निर्बंध आहेत आणि ज्या पदांच्या भरतीवर निर्बंध नाहीत अशा सरळसेवेच्या कोटयातील सर्व पदांच्या बाबतीत, गट-क व गट-ड मधील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २०% पदे अनुकंपा नियुक्तीद्वारे भरण्यात यावीत.

सदर २०% ची मर्यादा ही सन २०१९ या कॅलेंडर वर्षापासून तीन वर्षासाठी (१ जानेवारी,२०१९ ते ३१ डिसेंबर,२०२१) अंमलात राहील. त्यानंतर सन २०२२ या कॅलेंडर वर्षापासून (१ जानेवारी,२०२२ पासून) संदर्भाधीन शासन निर्णयानुसार अनुकंपा नियुक्ती देण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

यापुढे अनुकंपा नियुक्तीद्वारे पदभरतीसाठी असणारी मर्यादा विचारात घेऊन, अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी पदसंख्या निश्चित करताना जर ०.५ पेक्षा कमी संख्या येत असेल तर किमान एक पद अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावे.

अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या निश्चित करण्याच्या अनुषंगाने सुलभ संदर्भासाठी सोबतचे जोडपत्र पहावे.

२. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३७२/आपुक दि.३०.०८.२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१११७४०३८६९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2019.09.18 10:45:09 +05'30'

**(गीता रा. कुलकर्णी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. सर्व सन्माननीय विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७.सर्व मंत्रालयीन विभाग,
८. प्रबंधक मूळ शाखा, उच्च न्यायालय,मुंबई,
९. प्रबंधक अपिल शाखा, उच्च न्यायालय,मुंबई,
१०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१२. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१३. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, (विधान परिषद), मुंबई,
१४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई,
१६. महालेखापल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, मुंबई,
१७. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१,महाराष्ट्र, मुंबई,
१८. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१९. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
२१. मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे),कोकण भवन,नवी मुंबई,
२२. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
२३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख (संबंधित प्रशासकीय विभागामार्फत)
२५. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२६. निवड नस्ती. (कार्यासन-८)

शासन निर्णय क्रमांक : अकंपा -१२१९/प्र.क्र. ५६/आठ, दि. ११ सप्टेंबर,२०१९ सोबतचे जोडपत्र

**<u>जोडपत्र</u>**

अनुकंपा नियुक्ती करताना पदभरतीवरील निर्बंध तसेच अनुकंपा नियुक्तीसाठी असलेली पदसंख्येची मर्यादा विचारात घेऊन पद संख्या निश्चित करताना ब-याच वेळी संभ्रम निर्माण होतो. यासाठी अनुकंपा नियुक्तीसाठीची पदसंख्या निश्चित करताना खालील उदाहरणांचा सुलभ संदर्भासाठी वापर करावा.

**अ) या विभागाच्या शासन निर्णय क्र.अकंपा -१२१९/प्र.क्र. ५६/आठ, दि.१०.०६.२०१९ नुसार अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या निश्चित करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत होती.**

१) **सरळसेवेने भरावयाच्या ज्या पदांच्या भरतीस वित्त विभागाचे निर्बंध नाहीत :-** अशा पदांच्या बाबतीत सरळसेवेची मंजूर पदे १०० असतील व त्यापैकी ५० पदे रिक्त असतील तर सदर ५० पदांच्या १० % पदे म्हणजेच ५ पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यात येत होती.

२) **सरळसेवेने भरावयाच्या ज्या पदांच्या भरतीस वित्त विभागाचे निर्बंध आहेत :-** अशा पदांच्या बाबतीत सरळसेवेची मंजूर पदे १०० असतील व त्यापैकी ५० पदे रिक्त असून पदभरतीस निर्बंध असल्याने केवळ १० पदे भरण्यास मान्यता असेल तर सदर १० पदांच्या २०% पदे म्हणजेच २ पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यात येत होती.

**ब)** या शासन निर्णयानुसार अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षांसाठी निश्चित करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व त्यानंतर वरील अ) प्रमाणे पुन्हा कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) सरळसेवेने भरावयाच्या ज्या पदांच्या भरतीस वित्त विभागाचे निर्बंध आहेत आणि ज्या पदांच्या भरतीस वित्त विभागाचे निर्बंध नाहीत अशा सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांच्या २०% पदे भरताना खालील नमूद केलेल्या उदाहरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

उदा:- सरळ सेवेची १०० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५० पदे रिक्त आहेत व पद भरतीस निर्बंध असल्यामुळे १० पदे भरण्यास मान्यता आहे. अशावेळी एकूण रिक्त पदांच्या २०% पदे म्हणजेच ५० पदांपैकी १० पदे अनुकंपा नियुक्तीद्वारे भरावीत.

**क)** रिक्त पदांची गणना ही संबंधित पदांच्या मागील जाहिरातीच्या दिनांकापासून करण्यात यावी. मात्र अशी गणना करण्याच्या दरम्यानच्या काळात आकृतिबंध निश्चित झाला असल्यास त्यानुसार पदसंख्या विचारात घेऊन सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांपैकी अनुकंपा नियुक्तीसाठीची पदसंख्या निश्चित करावी.

**ड) तसेच यापुढे अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या अपूर्णांकात येत असताना खालील नमूद केलेल्या उदाहरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.**

उदा:- (१) अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या १ पेक्षा कमी येत असल्यास (म्हणजेच ०.२, ०.६, ०.८ वगैरे) किमान १ पद अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावे.

(२) मात्र अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या १ किंवा त्यापेक्षा जास्त पण ती पूर्णांकात नसून अपूर्णांकात येत असल्यास अशावेळी संबंधित अपूर्णांक हा ०.१ ते ०.४९ असल्यास त्यापूर्वीच्या पूर्णांक संख्येइतकी पदे अनुकंपा नियुक्तीने भरावीत आणि जर संबंधित अपूर्णांक हा ०.५० ते ०.९९ असल्यास त्यानंतरच्या पूर्णांक संख्येइतकी पदे अनुकंपा

नियुक्तीने भरावीत. म्हणजेच जर अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या ही ४.४० असल्यास अनुकंपा नियुक्तीद्वारे ४ पदे भरण्यात यावीत. आणि जर अनुकंपा नियुक्तीची पदसंख्या ही ४.६० असल्यास अनुकंपा नियुक्तीद्वारे ५ पदे भरण्यात यावीत.

इ) **प्रतिवर्षी रिक्त होणारी सरळसेवेच्या पदांपैकी अनुकंपाद्वारे पदभरतीची टक्केवारी निश्चित करताना प्रतिवर्षी रिक्त होणारी पदे म्हणजे कोणती पदे याबाबत अनेकवेळा शासनाकडे विचाराणा होत असल्याने याअनुषंगाने अपेक्षित असणारी कार्यवाही पुढीलप्रमाणे आहेः-** प्रतिवर्षी सरळसेवेची जी पदे रिक्त होतात ती त्या त्या वर्षी मागणीपत्र पाठवून भरणे अपेक्षित असते. त्यानुसार मागणीपत्र पाठविताना त्या त्या वर्षातील रिक्त पदांपैकी अनुकंपा नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या टक्केवारी इतकी पदे अनुकंपा नियुक्तीने भरणे अभिप्रेत आहे. तथापि, प्रत्यक्षात प्रतिवर्षी सरळसेवेची जी पदे रिक्त होत आहेत त्या पदांचे मागणीपत्र त्या त्या वर्षी पाठविले जात नाही. अशावेळी जर दोन किंवा तीन वर्षानंतर सरळसेवेच्या रिक्त पदांचे मागणीपत्र पाठविण्यात येत असेल तर त्या सर्व रिक्त पदांपैकी अनुकंपा नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या टक्केवारी इतकी पदे अनुकंपा नियुक्तीने भरणे अभिप्रेत आहे.

***************